जळगाव दि.16

प्रभावी अभिनय, दिग्दर्शन, लेखनासाठी विदयार्थी कलावंतानी चिकाटी व मेहनत घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. नाटयाप्रती अंगातले सळसळेपण जीवंत ठेवण्यासाठी सखोल अभ्यास करून भूमिका जगली पाहिजे, तरच नाटयचळवळ सशक्त होईल आणि उत्तम कलाकृती नाटय रसिकांना पहायला मिळेल तेव्हा मिळालेली दाद तुमच्या कलेला पुढे जाण्यास नक्कीच प्रोत्साहन देईल असे आवाहन विदयार्थी कलावंताना ज्येष्ठ अभिनेते आणि प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष अरूण नलावडे यांनी केले.

महाराष्ट्र कलोपासक (पुणे) आणि केसीई सोसायटीच्या अमृत महोत्सवानिमित्त मूळजी जेठा महाविद्यालयाच्या नाटयशास्त्र विभागातर्फे आयोजीत पुरूषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. मंचावर अध्यक्षस्थानी केसीई संस्थेचे सदस्य हरिश

मिलवाणी, प्रमुख पाहुणे निवासी उपजिल्हाधिकारी राहूल मुंडके, प्राचार्य डॉ.उदय कुलकर्णी, कलोपासक पुणेचे राजेंद्र नागरे, परिक्षक श्रीपाद देशपांडे, अजय धवने, गिरीष केमकर, संस्थेचे सभासद शशिकांत वडोदकर, चारूदत्त गोखले, उपस्थित होते.

प्रस्तावनेत नाटयशास्त्र विभागप्रमुख हेमंत पाटील यांनी स्पर्धेचा आढावा घेत विदयार्थी, शिक्षक व आयोजन समित्यांनी यशस्विरित्या स्पर्धा पार पाडली याबद्दल आभार मानले. राजेंद्र नांगरे यांनी केसीई सोसायटीचे आभार मानत स्पर्धा शांततेत पार पाडण्यात विदयार्थी कलावंतानी, नाटय रसिकांनी सहकार्य केले याबद्दल गौरवोद्गार काढले.

परिक्षक अजय धवने, गिरीश केमकर यांनी विदयार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करीत एकांकिका सादरीकरणामध्ये ज्वंलत व महत्वाच्या विषयांना प्रभावीपणे सादर करण्याचा प्रयत्न एकांकिकामध्ये झाल्याचे सांगितले. तसेच पुढील वर्षी अधिक

जोमाने, सकस तयारीनीशी विदयार्थ्यांनी उतरावे, संघाचा सहभाग वाढावा असे आवाहन केले.

आरडीसी मुंडके यांनी कला सादरीकरणात अभिनेत्याचा सशक्त अभिनय मोठया प्रमाणात एकांकिका सर्वात्कृष्ट करतो असे सांगत पुरूषोत्तम करंडक स्पर्धा ही विदयार्थ्यांच्या सुप्त गुणांना व कलेला वाव देण्याचे काम करते असे ते यावेळी म्हणाले.

अध्यक्षस्थानी बोलतांना हरिष मिलवाणी यांनी सांगितले की, केसीई संस्था विदयार्थ्यांच्या सर्वात्कृष्ट शिक्षणासाठी कायम तत्पर असते. परिक्षकांनी केलेले उत्तम परिक्षण हे विदयार्थ्यांना खूप काही शिकवून जाणार आहे. विदयार्थ्यांनी पुढील वर्षी अधिक जोमाने स्पर्धेत उतरावे असेही आवाहन मिलवाणी केले.

सूत्रसंचालन व आभार प्रा.योगेश महाले यांनी मानले. स्पर्धा यशस्वितेसाठी शशिकांत वडोदकर, प्रा.जुगलकिशोर दुबे, प्रा.विश्वजित चौधरी, प्रा.कपील शिंगाणे, प्रा.प्रसाद देसाई, प्रा.स्वप्ना लिंबेकर, प्रा.योगेश महाले, डि.डी.झोपे, प्रा.विजय लोहार, प्रा.अविनाश काटे, राकेश वाणी यांच्या अध्यक्षतेखाली समित्यांचे सदस्य, तंत्रसहायक दिनेश माळी, अश्विनी कोल्हे, प्रशांत जावळे, देवेंद्र गुरव, सागर सांळुखे, शुभम बेलसरे, उदय पाठक, बळवंत गायकवाड, हर्षदा नाईक, कमलाकर पाटील, पियुष रावळ, भाग्यश्री चौधरी, उन्नती राठोड, वसीम तडवी, सिद्‌धेश मोरे आदींनी परिश्रम घेतले.

*****************************************************

रंगभूषाकारांचा सत्कार

ज्येष्ठ रंगभूषाकार योगेश शुक्ल आणि चिंतामण पाटील यांनी तीन दिवस अथक परिश्रम घेत सर्व संघाच्या कलावंत

विदयार्थ्यांची रंगभूषा व वेशभूषा उत्तमरित्या करीत विदयार्थ्यांच्या सर्वात्तम सादरीकरणात हातभार लावला. याबद्दल त्यांचा समारोपावेळी विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यांना श्रृती चौटे, अस्मिता कुलकर्णी, तुषार सांगोरे, यशश्री उगले यांनी सहकार्य केले.

*****************************************************

पुढील करंडक डॉ.जी.डी.बेंडाळे यांच्या नावाचा

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीने 75 व्या वर्षात पदार्पण केले  तसेच अण्णासाहेब स्व.डॉ. जी.डी.बेंडाळे यांचे जन्मशताब्दी वर्ष 2017-18 चे औचित्य साधत पुढील वर्षी होणारा पुरूषोत्तम करंडक हा डॉ.जी.डी.बेंडाळे यांच्या नावाने देण्यात येईल अशी घोषणा यावेळी संस्थेच्या वतीने सभासद शशिकांत वडोदकर यांनी केली.

******************************************************

## स्पर्धेचा निकाल -

सांघिक प्रथम क्रमांक - रावीपार (प्रताप महाविद्यालय), ५०००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र

सांघिक द्वितीय क्रमांक - नाटक (शासकीय अभियात्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद), ३०००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र

सांघिक तृतीय क्रमांक - च्या बही (डॉ.बेंडाळे महिला महाविद्यालय), २०००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र

सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका - एक्स (नाहटा महाविद्यालय, भुसावळ), ५०००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र

अभिनय नैपुण्य (पुरुष) - नाटक (शासकीय अभियात्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद), भूमिका - संदीप आणि आबा (अभय पिंगळे), १०००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र.

अभिनय नैपुण्य (स्त्री) - च्या बही (डॉ.बेंडाळे महिला महाविद्यालय), भूमिका - जोकर २ (सपना बाविस्कर), १०००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र.

सर्वोत्क्रुष्ट वाचिक अभिनय नैपुण्य - पुरुष (कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ), भूमिका - मेघा (भाग्यश्री भंगाळे), १५००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र.

सर्वोत्क्रुष्ट अभिनय नैपुण्य - एक्स (नाहटा महाविद्यालय, भुसावळ), भूमिका - क्रमांक १ (स्वरदा गाडगीळ), १५००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र.

सर्वोत्क्रुष्ट लेखक- स्वरदा गाडगीळ, एक्स (नाहटा महाविद्यालय, भुसावळ), १५००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र.

सर्वोत्क्रुष्ट दिग्दर्शक - भूमिका पाटील, रावीपार (प्रताप महाविद्यालय), १५००/- चे बक्षीस, फिरता करंडक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र.

यातील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि प्रायोगिक एकांकिका या चार एकांकिका पुणे येथे होणाऱ्या पुरुषोत्तम करंडक महाअन्तिम राज्यस्तरीय स्पर्धेत पोहोचल्या आहेत.